मुंबईमध्यें उद्भवलेल्या वाईट रोगाच्या शमनार्थ तारीख २९ आक्टोबर १८९६ गुरुवार रोजीं उपास करून "दयेचें द्वार," या प्रार्थना मंदिरीं करण्यासाठीं अ. योसेफ येहेजकेल राजपुरकर यांनीं रचिलेली प्रार्थना.

हे दयासागरा ! तुजकडे वर आमची दृष्टी लावायास, तुजकडे आमचे हात पसरायास आणि तुजपासून दया मागायास आह्मांस लज्जा वाटते, व आम्ही विस्मित होतों. कारण आमचे अपराध आमच्या डोक्यावर गेले आहेत आणि आमचे अतिक्रम आकाशापर्यंत वाढले आहेत. आणि त्यामुळें तुझा कठोर न्याय आह्मावर आला आहे, पीडा पसरली आहे आणि पटकी वाढत चालली आहे. कारण हे परमेश्वरा आमच्या देवा, तुझा राग चेतला आहे आणि तुझा क्षोभ आम्हांवर आला आहे. मरणाचीं भयें आह्मांवर पडलीं आहेत; भय व कांपणें आह्मास लागलें आहे. यास्तव आह्मी आज तुझ्या पादासनापुढें विनंती करण्यास व तुझ्या दयेची वाट पाहणारांकरितां तुझ्या दयेस जागृत करण्यास आलों आहों.

हे दयाळु बापा, तुला आमची दया येऊं दे आणि प्रसन्नतेनें आमची प्रार्थना मान्य कर. आमच्या दुष्टाईकडे वळूं नको आणि आमच्या विनंतीपासून लपून राहूं नको. आणि जसें तूं आपला सेवक मोशे यास उत्तर दिलेंस आणि त्यास ह्मणालास कीं तुझ्या ह्मणण्याप्रमाणें म्यां क्षमा केली आहे; तसें आह्मांस उत्तर दे आणि हे बापा, आह्मास क्षमा कर, आणि हे आमच्या राजा ! आह्मांस माफी दे. आणि आम्हांवरून तुझ्या सर्व इस्राएल लोकांवरून आणि ह्या देशांतील सर्व राहणाऱ्यांवरून मरी, दुष्काळ, दुःख, पटकी आणि सर्व कठोर व वाईट निवाडे दूर कर. तुझ्या पंखाच्या छायेखालीं आम्हांस आश्रय दे, आणि आमच्या घराकडे कोणतीही पीडा येऊं देऊं नको.

हे जगत्कर्त्या, पाहा आम्ही तुझ्या कृपेवर भरंवसा ठेविला आहे आणि तुझ्या मोठ्या दयेवर आशा ठेविली आहे. कारण राग आवरण्याचा तुझा मार्गच आहे आणि तुझ्या प्राणिमात्रांवर दया करण्याची तुझी चालच आहे. तर आमच्या विनंतीचें उत्तर दे आणि आहारोन व त्याचे पुत्र जे याजक यांनीं तुजपुढें दाखविलेल्या सुगंधाप्रमाणें आमची प्रार्थना समजून ही पटकी आह्मांवरून, तुझ्या इस्राएल लोकांवरून, व तुझ्या तारणाची आशा करणारांवरून बंद कर. लागलेल्यांची व पीडा झालेल्यांची करुणा कर. कारण तूं दयाळू व कृपाळू देव आहेस. हे परमेश्वरा, आह्मांस निरोगी कर म्हणजे आम्ही निरोगी होऊं. आह्मास तार ह्मणजे आह्मी तरूं. कारण तूं आमचा स्तुतिपात्र आहेस. आमची आरोळी ऐकण्यासाठीं तूं जवळ ऐस आणि "असें होईल कीं त्यांनीं हाक मारल्यापूर्वीं मी उत्तर देईन, ते बोलतांच मी ऐकेन" या शास्त्रांत ह्मटलेल्या वाक्याप्रमाणें आम्हास उत्तर दे. कारण आम्हांस विश्वासू व दयाळू वैद्य तुजवांचून कोणी नाहीं आणि संकटाच्या व विपत्तीच्या समयीं उद्धरणारा, सोडविणारा, उत्तर देणारा व दया करणारा तुजशिवाय कोणी नाहीं. आणि जर तूं ही दया आम्हाकरितां करीत नसलास तर तूं आपणाकरितां तरी कर. आणि तूं आपल्या नामाकरितां आह्मास लवकर तार. आमेन. अशी त्याची प्रसन्नता होवो.

PRAYER

FOR THE

SUPPRESSION OF THE PLAGUE

IN BOMBAY,

OFFERED AT

THE SHAAR HARAHAMIM SYNAGOGUE,

ON THE DAY OF HUMILIATION,

29th OCTOBER 1896,

BY

JOSEPH EZEKIEL.

Merciful God ! we are ashamed to raise our eyes, and we are confounded to spread our hands towards Thee and ask mercy from Thee because our sins overwhelm us, and our iniquities have risen up to heaven. Severe judgment has been pronounced against us, a pestilence is spread among us, and the plague is increasing, because, O Lord, our God, Thy wrath is kindled and Thy anger is come upon us. Terrors of death have fallen upon us ; fear and trembling have come upon us. We have therefore come this day to pour our supplications before Thy footstool and to rouse Thy mercy upon all who wait for Thy grace.

Merciful Father ! be gracious unto us ; accept our prayer with pleasure ; turn not towards our wickedness, and hide not Thyself from our entreaties. Answer our prayer this day as Thou didst answer Thy servant Moses ; and, as Thou didst say unto him, "I have pardoned according to thy word," so forgive us, O our Father, and pardon us, O our King ; and remove pestilence, famine, misery, plague, and all severe and evil decrees from us, from all Thy people Israel, and from all the inhabitants of this country. Shelter us under the shadow of Thy wings, and suffer not destruction to enter our houses.

O Creator of the World ! we trust in Thy mercy and depend upon Thy grace ; because it is Thy way to withhold Thy anger, and Thy custom to have mercy on Thy creatures. Answer now our supplication, and regard our prayer like the sweet incense burnt by Aaron and his sons, the priests. Withhold this plague from us, from all Thy people Israel, and from all who wait for Thy salvation. Have compassion upon those who have already been smitten by, and are suffering from, the plague, because Thou art a kind and merciful God. Cure us and we shall be cured ; save us and we shall be saved, for Thou art our praise. Be Thou near unto our cries ; and answer us before we cry unto Thee, as it is said, "And it shall come to pass, that before they call, I will answer, and while they are yet speaking, I will hear" ; because we have no faithful and merciful Physician but Thee ; neither have we any one to redeem us, to deliver us, to answer us, and to have compassion on us, in all times of trouble and distress, besides Thee. If Thou showest not this mercy unto us for our sake, show it at least for Thy own sake ; and save us speedily for Thy name's sake. Amen. May such be His will.

תפלה לעצור המגפה בעיר במבי יע״א

שנאמרה בבית הכנסת שער הרחמים ביום תענית צבור

כב לחודש חשון שנת ה׳ת׳ר׳נ׳ז׳

מאת

הצעיר יוסף יחזקאל יצ״ו

אֵל מָלֵא רַחֲמִים · בּוֹשְׁנוּ וְנִכְלַמְנוּ לְהָרִים עֵינֵינוּ · וְלִפְרוֹשׂ כַּפֵּינוּ אֵלֶיךָ וּלְבַקֵּשׁ רַחֲמִים מִמְּךָ · כִּי עֲוֹנוֹתֵינוּ עָבְרוּ רָאשֵׁינוּ · וְאַשְׁמוֹתֵינוּ גָּדְלוּ עַד לַשָּׁמַיִם : וּמִדַּת הַדִּין קָשָׁה עָלֵינוּ · וְנֶגַע קָשֶׁה עָלֵינוּ · וְהַדֶּבֶר הוֹלֵךְ וְגָדֵל · כִּי חָרָה אַפֶּךָ וְהַקֶּצֶף יָצָא מִלְּפָנֶיךָ יְיָ אֱלֹהֵינוּ : וְאֵימוֹת מָוֶת נָפְלוּ עָלֵינוּ יִרְאָה וָרַעַד בָּאוּ בָנוּ · עַל כֵּן בָּאנוּ הַיּוֹם לִשְׁפּוֹךְ עֲתִרָתֵנוּ לִפְנֵי הֲדוֹם רַגְלֶיךָ · וּלְעוֹרֵר רַחֲמֶיךָ עַל כָּל הַמְיַחֲלִים לְחַסְדֶּךָ : אָב הָרַחֲמָן · הִתְמַלֵּא רַחֲמִים עָלֵינוּ · וְקַבֵּל בְּרָצוֹן אֶת תְּפִלָּתֵנוּ · אַל תֵּפֶן לְרִשְׁעֵינוּ וְאַל תִּתְעַלָּם מִבַּקָּשָׁתֵנוּ · וַעֲנֵנוּ הַיּוֹם כְּמוֹ שֶׁעָנִיתָ לְמֹשֶׁה עַבְדֶּךָ · וְאָמַרְתָּ אֵלָיו סָלַחְתִּי כִּדְבָרֶיךָ · כֵּן סְלַח לָנוּ אָבִינוּ · וּמְחוֹל לָנוּ מַלְכֵּנוּ · וְהָסֵר מִמֶּנּוּ וּמִכָּל עַמְּךָ יִשְׂרָאֵל וּמִכָּל יוֹשְׁבֵי הָאָרֶץ הַזֹּאת דֶּבֶר וְרָעָב וְיָגוֹן וּמַגֵּפָה וְכָל גְּזֵירוֹת קָשׁוֹת וְרָעוֹת : וּבְצֵל כְּנָפֶיךָ תַּסְתִּירֵנוּ · וְאַל תִּתֵּן הַמַּשְׁחִית לָבֹא אֶל בָּתֵּינוּ :

בּוֹרֵא עוֹלָם · הִנֵּה אֲנַחְנוּ בְּטוּחִים עַל רַחֲמֶיךָ · וְנִשְׁעָנִים עַל רוֹב חֲסָדֶיךָ · כִּי דַרְכְּךָ לְהַאֲרִיךְ אַפֶּךָ וּמִנְהָגְךָ לְרַחֵם עַל בְּרִיּוֹתֶיךָ :

עֲנֵה אֶת עֲתִרָתֵנוּ · וְתֵחָשֵׁב אֶת תְּפִלָּתֵנוּ כִּקְטֹרֶת הַסַּמִּים שֶׁהִקְטִירוּ לְפָנֶיךָ אַהֲרֹן וּבָנָיו הַכֹּהֲנִים וְתַעֲצוֹר אֶת הַמַּגֵּפָה הַזֹּאת מֵעָלֵינוּ וּמֵעַל כָּל עַמְּךָ יִשְׂרָאֵל · וּמֵעַל כָּל הַמְקַוִּים לִישׁוּעָתֶךָ : וַחֲמוֹל עַל כָּל מֻכִּים וּנְגוּעִים · כִּי אֵל רַחוּם וְחַנּוּן אַתָּה : רְפָאֵנוּ יְיָ וְנֵרָפֵא · הוֹשִׁיעֵנוּ וְנִוָּשֵׁעָה כִּי תְהִלָּתֵנוּ אָתָּה : הֱיֵה נָא קָרוֹב לְשַׁוְעָתֵנוּ · וְטֶרֶם נִקְרָא אֵלֶיךָ אַתָּה תַעֲנֵנוּ : כְּמוֹ שֶׁנֶּאֱמַר וְהָיָה טֶרֶם יִקְרָאוּ וַאֲנִי אֶעֱנֶה · עוֹד הֵם מְדַבְּרִים וַאֲנִי אֶשְׁמָע : כִּי אֵין לָנוּ רוֹפֵא נֶאֱמָן וְרַחְמָן זוּלָתֶךָ · וְאֵין לָנוּ פּוֹדֶה וּמַצִּיל וְעוֹנֶה וּמְרַחֵם בְּכָל עֵת צָרָה וְצוּקָה בִּלְעָדֶיךָ : וַעֲשֵׂה נָא עִמָּנוּ הַחֶסֶד הַזֶּה לְמַעַנְךָ אִם לֹא לְמַעֲנֵנוּ · וְהוֹשִׁיעֵנוּ מְהֵרָה לְמַעַן שְׁמֶךָ : אב״ר :

अशा प्रसंगीं दानधर्म करणें व मंदिरास देणगी देणें उचित आहे. तर ज्यांस कांहीं पाठविणें असेल, तें त्यांनीं अ. मोशे बापूजी मळेकर सु. मे. स. बा. चौगले जे. पी. यांजकडे पाठविणें.